29 SEP 2022 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राष्ट्रीय सेवा योजनेचे संस्कार जपा

## डी. कार्तिकियन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय सेवा योजनेचा सुसंस्कार आयुष्यभर जपण्यावर स्वयंसेवकांनी भर द्यावा, असे आवाहन भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय संचालक डी. कार्तिकियन यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात बुधवारी सकाळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या तीन दिवसीय राष्ट्रीय; राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिराचे उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील होते.

कार्तिकियन म्हणाले, राज्यभरातील विद्यापीठांमध्ये सध्या ३ लाख ५४ हजार राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक आहेत. त्यामधून मोजक्या ३८० स्वयंसेवकांना राष्ट्रीय व राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलनाच्या निवड शिबिरात सहभागाची संधी मिळालेली आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, राष्ट्रीय पथसंचलनात महाराष्ट्राचा टक्का वाढावा, यासाठी संचलनासाठी विद्यापीठांच्या स्तरावर सातत्याने शिबिरांचे आयोजन करण्याची आवश्यकता आहे.

यावेळी क्षेत्रीय कार्यालयाचे युवा अधिकारी अजय शिंदे, उन्नत भारत अभियानाचे संचालक डॉ. टी. आर. पाटील, विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, मंगेश खैरनार, रमेश देवकर, कॅप्टन प्रशांत पाटील, कॅप्टन राहुल मगदूम उपस्थित होते प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, राष्ट्रीय येवा योजनेचे राज्य संपर्क प्रमुख डॉ. प्रशांतकुमार वनंजे प्रमुख उपस्थित होते.

पुढारी



कोल्हापूर : डॉ. विजयाराणी पाटील लिखित 'महाराणी जिजाबाई : कोल्हापूरच्या रक्षणकर्त्या' पुस्तकाचे प्रकाशन सौ. संयोगिताराजे यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. रमेश जाधव, डॉ. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. भारती पाटील.

# क्रांतिकारी जिजाबाईंच्या इतिहासाला उजाळा : संयोगिताराजे

## डॉ. विजयाराणी पाटील लिखित पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जिजाबाईंनी कोल्हापूर राज्याच्या संरक्षणाची अत्यंत महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडली. आपल्या कारकिर्दीत क्रांतिकारी निर्णय घेत काही कुणबीनींणा प्रशासनाची जबाबदारी दिली. तसेच सती बंदीचा कायदाही केला. अशा या कर्तृत्ववान जिजाबाई यांच्याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती. त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाशझोत टाकणारे 'महाराणी जिजाबाई : कोल्हापूरच्या रक्षणकर्त्या' हे पुस्तक भावी पिढीला प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास संयोगीतराजे यांनी व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठाच्या कै. श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने डॉ. विजयाराणी पाटील लिखित पुस्तकाचा प्रकाशन सौ. संयोगिताराजे यांच्या हस्ते व ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांच्या उपस्थितीत झाले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते. यावेळी डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. एस. एन. पवार उपस्थित होते. अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी पुस्तक प्रकाशनामागील अध्यासनाची भूमिका स्पष्ट केली. डॉ. रमेश जाधव यांनी हे पुस्तक ज्या विषयावर माहिती उपलब्ध नाही, त्या विषयावर पीएच.डी. करून डॉ. विजयाराणी पाटील यांनी मोठे धैर्य दाखवले आहे. अध्यक्षीय समारोपात डॉ. पी. एस. पाटील यांनी या पुस्तकाचे इंग्रजी आणि इतर भाषामध्ये भाषांतर झाल्यास जिजाबाईंचे कार्यकर्तृत्व सर्वदूर पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला. सूत्रसंचालन सुष्मिता खुटाळे यांनी केले. आभार प्रा. नेहा वाडेकर यांनी मानले.

तरूण भारत

# विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागात मार्गदर्शन कार्यशाळा

कोल्हापूर : तंत्रज्ञान अधिविभागात बारावी नंतर प्रथम वर्ष इंजिनीअरिंग प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ या विषयावरील मार्गदर्शन कार्यशाळेचे शनिवार १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजन केले आहे. तंत्रज्ञान अधिविभागातील कार्यक्रमात प्रवेश प्रक्रियेचा निकाल, कॅप राऊंड, ऑपशन भरताना व ब्रँच निवडताना घ्यावी लागणारी काळजी, प्रवेश प्रक्रिया संदर्भातील शंकांचे निरसन केले जाणार आहे. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांच्यासह तज्ज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत.

लोकमत

# ‘अभियांत्रिकी’बाबत विद्यापीठात मार्गदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे इयत्ता बारावीनंतर प्रथम वर्ष अभियांत्रिकी (इंजिनिअरिंग) प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ या विषयावरील मार्गदर्शनपर कार्यक्रम शनिवारी (दि. १ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता तंत्रज्ञान अधिविभागामध्ये होणार आहे. प्रवेश प्रक्रियेचा निकाल, कॅप राऊंड, ऑप्शन भरताना आणि ब्रँच निवडताना घ्यावी लागणारी काळजी याबाबत तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली आणि प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत.

पुण्यनगरी

# अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागामध्ये बारावीनंतर प्रथम वर्ष इंजिनिअरिंग प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ या विषयावरील मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शनिवार, दि. १ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता तंत्रज्ञान अधिविभागामध्ये होणार आहे. या वर्षी जाहीर झालेल्या प्रवेश प्रक्रियेचा निकाल, कॅप राऊंड, ऑपशन भरताना व ब्रँच निवडताना घ्यावी लागणारी काळजी तसेच प्रवेश प्रक्रियासंदर्भात इतर सर्व शंकांचे निरसन करण्यासाठी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली व तज्ज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत.

2 9 SEP 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात १५, १६ ऑक्टोबर रोजी स्टार्टअप यात्रेंतर्गत विविध कार्यक्रम

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

नागरिकांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाद्वारे महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेंतर्गत यापुढील टप्प्यातील कार्यक्रम दि. १५, १६ ऑक्टोबरला शिवाजी विद्यापीठात होणार आहेत.

स्टार्टअप यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यात स्टार्टअप बाबत प्रचार, प्रसार व प्रबोधन करण्यात आले. स्टार्टअपबाबत संपूर्ण माहिती, नावीन्यपूर्ण संकल्पना त्याचे इतर पैलू याबाबतची माहिती देण्यात आली. यापुढील टप्प्यात जिल्हास्तरीय प्रशिक्षण शिबिर व सादरीकरण स्पर्धा होतील. प्रशिक्षण शिबिरात नवउद्योजकतेबाबतचे माहिती सत्र, स्थानिक उद्योजक व तज्ज्ञ मार्गदर्शक यांची व्याख्याने होतील. नोंदणी केलेल्या नवउद्योजकांच्या संकल्पनांची सादरीकरण स्पर्धा आयोजित केली जाईल. राज्यस्तरीय सादरीकरण स्पर्धा व विजेत्यांची घोषणा होईल. प्रत्येक सादरीकरण सत्रातील उत्तम दहा कल्पनांचे राज्यस्तरीय सादरीकरण तज्ज्ञ समितीसमोर होईल. राज्यस्तरीय विजेत्यांना १ लाख रुपयांचे अनुदान व आवश्यक पाठबळ पुरविण्यात येईल.

अधिक माहिती व सहभागासाठी www.msins.in किंवा www.mahastartupyatra.in वर भेट द्यावी, असे आवाहन रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. डी. राऊत यांनी दिली.

पुढारी

# बी.ए.चे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** बी.ए. सेमिस्टर ५ व ६ अशा दोन परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आले असून आजपर्यंत एकूण ५२८ परीक्षांचे निकाल घोषित झाले आहेत. अभ्यासक्रमांच्या परीक्षा या ओएमआर उत्तरपत्रिकांचा वापर करून झालेल्या आहेत. ओएमआर सिटवर विद्यार्थ्यांनी त्यांचा पीआरएन नंबर, बैठक क्रमांक, विषय सांकेतांक इ. माहिती चुकीची लिहिल्यामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या निकालामध्ये अनुपस्थित असे नमूद होऊन निकाल घोषित झाले आहेत.

अशा विद्यार्थ्यांचे निकाल सुधारित करण्यासाठी माहिती संकलित करण्यात येत आहे. त्यासाठी लॉगिन आयडी पासवर्डचा वापर करून माहिती सादर करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या ५२८ परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील ७४७ परीक्षांपैकी ५२८ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. परंतु काही विद्यार्थ्यांनी ओएमआरवर पीआरएन नंबर, बैठक क्रमांक, विषय सांकेतांक, आदी माहिती चुकीची भरल्याने निकाल उपलब्ध नसल्याचा आला आहे. अशा विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याचे काम परीक्षा विभागाच्या वतीने सुरू आहे. तरी अधिविभाग आणि महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या लिंकवर परीक्षा अप्रूव्ह करण्यासाठी लॉगीन आयडी पासवर्डचा वापर करून विद्यार्थ्यांची माहिती सादर करावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.